


Anusandhanvallari
Vol 2025, No.1
January 2025
ISSN 2229-3388

# यशवंत मनोहर यांच्या 'भारताचे क्रांतीसंविधान' मधील न्याय संकल्पना: एक चिकित्सक अभ्यास

**शशिमोहन भारत थूटे, डॉ. ईश्वर सोमनाथे**

विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर

**सारांश:** भारतीय संविधानामध्ये न्याय हे एक महत्त्वाचे तत्व आहेत. यशवंत मनोहर यांनी त्यांच्या वैचारिक साहित्यात भारतीय संविधानाच्या न्यायव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. ते न्यायाच्या तत्त्वावर आधारित समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुधारणावर चर्चा करतात. त्यांच्या लेखनात न्यायाच्या या विविध बाबी भारतीय संविधानाशी जोडून एक सुसंगत दृष्टिकोन मांडला जातो. न्यायाच्या या संदर्भात यशवंत मनोहर यांनी आपले विचार मांडले आहेत आणि त्याला संविधानमूल्य म्हणून विशद केले आहेत.

भारतीय समाजातील विविध समस्यांना निरनिराळ्या परिपक्षात पाहता यशवंत मनोहर यांनी सामाजिक न्याय, आर्थिक न्याय आणि राजकीय न्याय या बाबीचा सखोल अभ्यास केला आहे. प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार समान संधी आणि समान हक्क मिळवून देणारी न्यायव्यवस्था स्थापन करण्याची आवश्यकता त्यांनी आपल्या लेखनात अधोरेखित केली आहे.

**बीज शब्द :-** यशवंत मनोहर, भारताचे क्रांतिसंविधान, न्याय, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, राजकीय न्याय.

**प्रस्तावना :**

डॉ. यशवंत मनोहर यांच्या लेखनात न्याय हे तत्व अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या वैचारिक साहित्यात न्याय हे व्यापक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टिकोनातून मांडले गेले आहे. न्याय हा केवळ कायद्याचा विषय नाही तर ते एक संविधानिक मूल्य आहे, जे समाजातील प्रत्येक घटकाला समान अधिकार, समान संधी आणि समान सन्मान देण्यासाठी आवश्यक आहे. यशवंत मनोहर यांच्या लेखनात न्यायाच्या तत्त्वांचा अभ्यास आंबेडकरवादी दृष्टिकोनातून करण्यात आला आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जाती, धर्म आणि लिंग यांच्या पलीकडे जाऊन समान हक्क मिळवून दिले जातात.

त्यांचे लेखन समाजातील विषमता, जातीवाद, धार्मिक भेदभाव आणि आर्थिक शोषणाच्या विरोधात एक ठाम भूमिका घेत आहे. ते मानतात की, न्यायांच्या प्रभावी अंमलबजावणीनेच समाजात समतेची स्थापना होऊ शकते. डॉ. मनोहर यांच्या लेखनात न्यायाचे समाजातील प्रत्येक स्तरावर विस्तृत अंमलबजावणी करण्यासाठी विचार केला गेला आहे. ज्यामुळे एक सशक्त आणि समताधिष्ठित समाज उभा होईल.

भारतीय संविधानाने न्याय या तत्त्वाला अत्यंत महत्त्व दिले आहे. संविधानाच्या उद्देशिकेतच न्याय, समानता आणि बंधुतेच्या तत्त्वांचा समावेश केलेला आहे. या तत्त्वांचा उद्देश समाजातील सर्व नागरिकांना समान हक्क, समान संधी आणि समान स्थान देणे आहे. डॉ. मनोहर यांच्या लेखनात न्याय हा एक संवेदनशील आणि सशक्तमूल्य आहे, जो केवळ कायद्यात नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात लागू होणारा असावा लागतो.

त्यांचे लेखन न्यायाचा अर्थ, त्याची अंमलबजावणी आणि न्यायाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लागणारे धोरण यांचा सर्वांगीण विचार करतील. न्याय हा केवळ एक कायदेशीर मुद्दा नसून तो एक सामाजिक आणि नैतिक मूल्य आहे. जो व्यक्तीच्या हक्कांच्या रक्षणासाठी समाजातील असमानतेच्या निर्मूलनासाठी आणि समाजातील विषमता आणि भेदभावाच्या विरोधात एक मार्गदर्शन करणारा ठरतो.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) 'भारताचे क्रांतिसंविधान' या ग्रंथातील न्याय संकल्पनेचा अभ्यास करणे.

Anusandhanvallari
Vol 2025, No.1
January 2025
ISSN 2229-3388

2) यशवंत मनोहर यांच्या न्याय विषयक विचारांचे स्वरूप स्पष्ट करणे.
3) न्याय आणि सामाजिक समता यांच्यातील संबंध तपासणे.
4) मनोहर यांच्या न्यायविचारातील परिवर्तनवादी आणि मानवतावादी भूमिका अधोरेखित करणे.
5) भारतीय संविधानाच्या मूल्यव्यवस्थेशी मनोहरांच्या न्यायव्यवस्थेचा संबंध स्पष्ट करणे.

**सामाजिक न्याय :-**

डॉ. यशवंत मनोहर यांचे लेखन एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन दर्शवते जो समतावाद आणि न्यायाच्या विचारधारेवर आधारित आहे. त्यांचे लेखन आंबेडकरवादी दृष्टिकोन आणि मानवाधिकारांचे तत्त्वज्ञान यावर आधारित आहे. त्यांच्या लेखनात सामाजिक न्याय हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे जो केवळ एक तत्त्वज्ञान म्हणून नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, सन्मान, आणि संधी देण्याची एक प्रक्रिया आहे. समाजातील असमानता, भेदभाव, जातिवाद आणि धर्मनिरपेक्षतेसाठीचे संघर्ष यशवंत मनोहर यांच्या लेखनातील केंद्रीय विचारशक्ती ठरतात.

सामाजिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जन्मस्थानानुसार जाती, धर्म किंवा लिंगाच्या पलीकडे जाऊन समान समान अधिकार आणि समान संधी दिली जावी. मनोहर यांच्या लेखनात सामाजिक न्याय हे संविधानिक मूल्यांचे पालन करत आहे आणि ते समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया म्हणून मांडले जाते.

सामाजिक न्याय ह्या तत्वाला संविधानिक अधिकार, मानवी हक्क आणि समानतेच्या सिद्धांतामध्ये रूपांतरित करण्यासाठी एक सशक्त आवाज म्हणून यशवंत मनोहर कार्यरत आहेत. समाजातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि समान संधी मिळवून देण्यासाठी सामाजिक न्यायाची अंमलबजावणी केल्याने एक सशक्त आणि समृद्ध समाज घडवता येईल हे ते विश्वासाने मानतात.

सामाजिक न्यायाचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातील उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय आणि निचवर्गीय अशा सर्व घटकांना समान अधिकार आणि संधी दिल्या जातील. यामुळे एक समताधिष्ठीत आणि न्यायपूर्ण समाज घडवता येईल. समाजातील एका वर्गाला कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा शोषण सहन करावे लागणार नाही, आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या कर्तुत्वावर आणि मेहनतीवर आधारित समान संधी मिळतील.

यशवंत मनोहर यांचे लेखन आंबेडकरवादी दृष्टिकोनातून बरेच प्रभावित झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील जातिवाद, भेदभाव आणि धार्मिक असमानता दूर करण्यासाठी सामाजिक न्यायाचा विचार मांडला आणि त्यांचा हा दृष्टिकोन मनोहर यांच्या लेखनात स्पष्टपणे दिसतो. आंबेडकरवादाच्या अंमलबजावणीसाठी सामाजिक न्यायाचे तत्व अत्यंत महत्त्वाचे आहे.

यशवंत मनोहर यांच्या 'संविधान आणि भारतीयत्व' या पुस्तकात, सामाजिक न्याय आणि त्याच्या तात्विक आधारावर सखोल विचार मांडले आहेत. या ग्रंथात त्यांनी सामाजिक न्याय या संकल्पनेची गहन चर्चा केली आहे आणि त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाची स्पष्ट मांडणी केली आहे. आंबेडकरांनी सामाजिक न्याय साधण्यासाठी ज्या पद्धतीनी उपाययोजना सुचवल्या त्या विचारांची सखोल मांडणी यशवंत मनोहर यांच्या लेखनात आहे.

सामाजिक न्याय हा एक समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय समानता आणि सन्मान देण्याचा आदर्श आहे. जो एक सर्वसमावेशक आणि न्यायपूर्ण समाज उभारण्यास मार्गदर्शक ठरतो. डॉ. यशवंत मनोहर यांचे लेखन हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी एक सशक्त व प्रेरणादायक मार्गदर्शन आहे जो समाजातील असमानतेला दूर करण्याचा प्रयत्न करतो.

**आर्थिक न्याय :-**

डॉ. यशवंत मनोहर यांचे लेखन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाच्या तत्त्वावर आधारित आहे. त्यांच्या लेखनात आर्थिक न्याय या तत्त्वाची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आर्थिक न्याय केवळ वित्तीय समानता किंवा धनसंपत्तीचे समान

Anusandhanvallari
Vol 2025, No.1
January 2025
ISSN 2229-3388

वितरण नसेल तर तो समाजातील प्रत्येक व्यक्तीला समृद्धी, आर्थिक सन्मान, आणि जीवनातील मूलभूत आवश्यकतांसाठी समान संधी देण्याचा एक व्यापक दृष्टिकोन आहे. डॉ मनोहर यांच्या लेखनात आर्थिक विषमता आणि शोषणाच्या विरोधात आवाज उठवला आहे. आणि आर्थिक न्यायाच्या अंमलबजावणीनेच समाजातील असमानता आणि भेदभाव कमी होऊ शकतात.

आर्थिक न्याय हे एक अत्यंत महत्त्वाचे संविधानिक मूल्य आहे जे समाजातील प्रत्येक घटकाला समान वित्तीय संधी देतो. आणि समाजातील आर्थिक विषमतेला कमी करून एक समृद्ध आणि न्यायपूर्ण समाज घडवण्याच्या दिशेने मार्गदर्शन करतो. यशवंत मनोहर यांचे लेखन आंबेडकरवादी दृष्टिकोनातून आर्थिक न्यायाची कल्पना स्पष्टपणे मांडते. आर्थिक शोषण, भेदभाव आणि समृद्धीच्या असमान वितरणावर आघात करणारा एक सशक्त दृष्टिकोन त्यांनी उभा केला आहे.

त्यांच्या लेखनात आर्थिक न्यायाची आवश्यकता, त्याची संविधानिक अंमलबजावणी आणि आर्थिक विषमतांच्या निर्मूलनाची प्रक्रिया अत्यंत सुसंगत आणि प्रभावीपणे मांडली गेली आहे. यामुळे डॉ. मनोहर यांचे लेखन केवळ एक तत्त्वज्ञान नसून ते सामाजिक परिवर्तनासाठी एक सशक्त मार्गदर्शन ठरते. जे आर्थिक न्यायच्या अंमलबजावणीसाठी एक योग्य आणि प्रभावी रणनीती प्रदान करते.

यशवंत मनोहर यांच्या 'भारताचे क्रांतीसंविधान' या पुस्तकात आर्थिक न्याय या विषयावर सखोल विचार मांडले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक न्यायाच्या तत्त्वज्ञानाने भारतीय संविधानाची रचना केली आहे. आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि संसाधने मिळवून देणे, विशेषत: समाजातील दुर्बल वर्गाला ज्यांना पारंपारिकपणे वंचित ठरवले गेले आहेत. यशवंत मनोहर यांनी आर्थिक न्यायाच्या पायाभूत तत्त्वावर विस्तृत प्रकाश टाकला आहे ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्याचा मार्ग मोकळा होतो.

आर्थिक न्याय म्हणजे केवळ भौतिक वस्तूचे वितरणच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला आर्थिक दृष्टीने समान संधी देणे आणि त्याच्या स्वावलंबनाची क्षमता निर्माण करणे. या न्यायाच्या सिद्धांतामुळे समाजातील वंचित आणि शोषित वर्गांना त्यांच्या हक्काची ग्वाही दिली जाते. यशवंत मनोहर यांनी 'भारताचे क्रांतीसंविधान' या पुस्तकात या आर्थिक न्यायाच्या संदर्भातील बाबींबद्दल खोलवर विचार केला आहे. डॉ आंबेडकरांच्या आर्थिक न्याय च्या तत्त्वज्ञानानुसार समाजाच्या सर्व स्तरावर असमानता दूर करण्यासाठी आर्थिक धोरणे आणि रचनात्मक उपाययोजना आवश्यक आहेत.

आर्थिक न्याय केवळ आर्थिक स्त्रोतांचे समान वितरण करणे नव्हे, तर यामुळे व्यक्तीला त्याच्या कर्तुत्वावर आधारित जीवन जगण्याची संधी मिळते. यशवंत मनोहर यांच्या मते आर्थिक न्याय समाजाच्या समतोल विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे भौतिक संसाधने, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पाणी यासारख्या मूलभूत गोष्टी प्रत्येक व्यक्तीला समान प्रमाणात मिळाव्यात या बाबीवर आर्थिक न्यायाचा आग्रह आहे. डॉ आंबेडकर यांनी आर्थिक न्याय या संकल्पनेला संविधानाच्या माध्यमातून अधिक प्रभावी साधन बनवले.

मनोहर यांच्या लेखनातील आर्थिक न्यायची अंमलबजावणी हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बदल करण्याची एक कळकळीची आवश्यकता आहे. डॉ यशवंत मनोहर यांचे लेखन आर्थिक न्यायाच्या अंमलबजावणीसाठी एक सशक्त विचारधारा प्रदान करते. त्यांनी समाजातील असमानतेला कमी करण्यासाठी शोषणाच्या विरोधात एक भूमिका घेतली आहे. त्यांचा विश्वास आहे की सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची अंमलबजावणी समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी समान संधी देईल.

आर्थिक न्याय हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण संविधानिक मूल्य आहे जे समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार सन्मानाने समान आर्थिक संधी येते.

**राजकीय न्याय :-**

राजकीय न्याय हे एक अत्यंत महत्त्वाचे तत्व आहे. त्याची निती समाजातील प्रत्येक नागरिकाला समान आणि निष्पक्ष वागणूक देण्याच्या दृष्टीने संविधानात मांडली गेली आहेत. यशवंत मनोहर यांच्या लेखनात राजकीय न्यायाचे विश्लेषण करताना त्यांना

ही संकल्पना भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांमध्ये एक महत्त्वाचा आधारभूत घटक दिसतो. राजकीय न्याय ही केवळ कायद्याची बाब नसून ती एक सामाजिक व नैतिक मूल्य आहेत.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेने दिलेल्या राजकीय न्यायाच्या आदर्शानुसार प्रत्येक नागरिकाला समान हक्क मतदानाचा अधिकार आणि जनतेमध्ये संधी देण्याचे वचन दिले आहेत. यशवंत मनोहर यांचे म्हणणे आहे की, राजकीय न्याय म्हणजे प्रत्येक नागरिकाला समान अधिकाराची आणि संधीची ग्वाही देणे. हे आदर्श लोकशाही मूल्य म्हणून एक महत्त्वाचा घटक आहे.

यशवंत मनोहर यांच्या मते राजकीय न्याय आणि लोकशाही न्याय या दोन तत्वांचा परस्पर संबंध आहे. त्यांचे म्हणणे आहे की लोकशाहीमध्ये राजकीय न्याय मिळवणे हे प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. ते राजकीय पक्षांच्या वर्तन आणि जनतेच्या मताधिकार यावर विशेष प्रकाश टाकतात. ते म्हणतात राजकीय पक्षांना सत्ता मिळवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे आणि त्या मार्गाने लोकांच्या न्यायाचा आदर करणे हे राजकीय न्यायाची महत्त्वाचे अंग आहे.

मनोहरांच्या लेखनातील राजकीय न्यायाच्या तत्त्वांचा अभ्यास करताना ते भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्वांचा आदर्श प्रस्तुत करतात. ते म्हणतात राजकीय न्याय हा केवळ एक कायदेशीर मुद्दा नाही तर ते एक सामाजिक मूल्य आहेत. ज्यामुळे लोकशाही मूल्य प्रस्थापित होतात "समान संधी आणि समान हक्कांचा अधिकार हे राजकीय न्यायाची तत्व आहे", हे मनोहर यांच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य अंग आहे.

राजकीय न्याय फक्त सत्तेच्या संबंधी नसून तो एक समाज बदलण्यासाठी महत्त्वाचा उपाय आहे. त्यांच्या मते राजकीय पक्षांची जबाबदारी आहे की ते जनतेला योग्य वागणूक आणि समान संधी देत असावे. ते म्हणतात "राजकीय पक्षांवर जबाबदारी घालणे आणि त्यांना सार्वजनिक हितासाठी कार्य करण्यास प्रवृत्त करणे हे राजकीय न्यायाचे एक महत्त्वाचे अंग आहे."

राजकीय न्याय हा केवळ संविधानिक अधिकार नाही तर ते एक समाजातील सामूहिक मूल्य आहे ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळवून देण्याची ग्वाही दिली जाते. यशवंत मनोहर यांचे लेखन आणि त्यांचे विचार राजकीय न्याय आणि लोकशाही न्याय यांना एक सामाजिक क्रांतिकारी उपाय म्हणून मांडतात. ज्यामुळे एक समान बंधनमुक्त आणि प्रगतिशील समाज घडवता येतो.

**निष्कर्ष :-**

1) सामाजिक न्याय, आर्थिक न्याय आणि राजकीय न्याय या सर्व बाबी संविधानात असलेल्या न्यायाच्या मूलभूत तत्वांवर आधारित आहेत. या न्यायाच्या तत्त्वामुळे एक सामाजिक, न्यायपूर्ण, समतावादी आणि समृद्ध समाज उभारण्याची दृष्टी प्राप्त होते.
2) सामाजिक न्याय फक्त एक कायदेशीर संकल्पना नाही तर एक सामाजिक मूल्य आहे. जे समाजातील असमानता आणि भेदभावाला नष्ट करते.
3) सामाजिक न्याय हा एक नवा आदर्श तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. तिचे समाजातील विविध घटकांमध्ये समानता आणि सहकार्याची भावना निर्माण करते.
4) आर्थिक न्याय हे तत्व यशवंत मनोहर यांच्या लेखनात एक महत्त्वाचा भाग आहे. आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तुत्वावर आधारित समान संधी आणि संसाधनाच्या समान वितरणाची संधी मिळवून देणे.
5) राजकीय न्याय म्हणजे प्रत्येक नागरिकाला समान मतदानाचा अधिकार योग्य प्रतिनिधीची निवड आणि त्याच्या राजकीय अधिकारांचा उपयोग करण्याची संधी मिळवणे.

**संदर्भ :-**

[1] डॉ यशवंत मनोहर,' भारताचे क्रांतीसविधान', हर्मिस प्रकाशन, पुणे.
[2] डॉ. यशवंत मनोहर,' डॉ. आंबेडकरांचा इहवादी सामाजिक न्याय'. युगसाक्षी प्रकाशन, नागपूर
[3] डॉ. यशवंत मनोहर, 'संविधान आणि भारतीयत्व,' निर्मल प्रकाशन, नांदेड.
[4] शरणकुमार लिंबाळे, 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' दिलीपराज प्रकाशन, पुणे.
[5] अशोक डोळस, डॉ. यशवंत मनोहर यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास, नागपूर विद्यापीठ, पीएचडी प्रबंध.